महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेच्या सल्लागार समितीवर अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मधोसं-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/१२-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दि. १६ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ : **१) शासन निर्णय क्र.मधोसं २०१७/प्र.क्र.४/२०१७/१२-अ, दि.७ जुलै, २०१७.**
२) महासंचालक, यशदा पुणे यांचे क्र.यशदा/मधोसंस/२०१६/०१, दि.७.११.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना:-

मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परि.१.२(ई) नुसार धोरण संशोधन संस्थेच्या नियमित कामकाजाची रचना व स्वरुप ठरविण्यासाठी सल्लागार समितीची रचना नमूद केली आहे. त्यानुसार यशदा, पुणे यांनी संदर्भाधीन क्र.२ च्या पत्रान्वये सदर सल्लागार समितीचे अध्यक्ष पदासाठी नामांकित अर्थतज्ञ डॉ.विजय केळकर, माजी वित्त सचिव, भारत सरकार यांचे नामनिर्देशन प्रस्तावित केले आहे.

त्या अनुषंगाने सदर धोरण संशोधन संस्थेच्या सल्लगार समितीवर अध्यक्षांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

धोरण संशोधन संस्थेच्या सल्लागार समितीमध्ये अंतर्भूत असलेल्या अध्यक्ष पदासाठी नामांकित अर्थतज्ञ डॉ.विजय केळकर , माजी वित्त सचिव, भारत सरकार यांना सदर समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्तीस शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर समितीची कार्यकक्षा, कार्यकाळ व समितीच्या कामाकाजास सहाय्यकारी व्यवस्था खालीलप्रमाणे राहील :-

* **समितीची कार्यकक्षा-**

अ) भारतातील तसेच इतर देशांतील नामांकित सार्वजनिक धोरण संस्था / महाराष्ट्र धोरण संशोधन संस्था यांचा तौलनिक अभ्यास करणे व विविध प्रकारच्या संस्थांची बलस्थाने व मर्यादा यांचे विश्लेषण करणे.

ब) महाराष्ट्र धोरण संशोधन संस्थेचे उद्देश तसेच वरीलप्रमाणे तौलनिक अभ्यासाची निरीक्षणे विचारात घेऊन संस्थेची नोंदणी, नियामक तसेच कार्यात्मक संरचना, कार्यकक्षा, व्हिजन, मिशन, तात्कालिक व दूरगामी उद्दिष्टे, इत्यादी बाबींसह एक मॉडेल तयार करुन शिफारस करणे.

क) धोरण संशोधन संस्थेचे आवार व भौतिक सुविधा यांचा समग्र आराखडा (Master Plan) बनविणे.

ड) धोरण संशोधन संस्थेत संशोधनाच्या दृष्टीक्षेपांसह (APPROACHES) विद्याशाखा कामकाजाची चौकट व स्वरुप तयार करुन सुचविणे.

इ) धोरण संशोधन संस्थेस आवश्यक वित्तीय संसाधनांचे स्त्रोत शोधून सुचविणे व संस्थेचे वित्तीय व्यवस्थापन तसेच एकंदर समग्र व्यवस्थापन यांचे स्वरुप सुचविणे

फ) समितीचा शिफारशींसह अहवाल तयार करणे व तो शासनाच्या सल्ल्याने अंतिम करुन सादर करणे.

* **समितीचा कार्यकाळ** :- समितीचा कार्यकाळ सुरुवातीस दोन वर्षे एवढा असेल.

* **समितीच्या कामकाजाच्या अनुषंगाने सहाय्यकारी व्यवस्था :-**

अ) समितीस संशोधन सहाय्य व कार्यालयीन सहाय्यासाठी आवश्यक सेवा यशदाकडून त्यांच्या प्रचलित पध्दतीनुसार देण्यात येतील.

ब) समितीस आवश्यक असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण तांत्रिक / व्यावसायिक सेवा (जसे वास्तुविशारद, अभियंता) यशदाकडून त्यांच्या प्रचलित पध्दतीनुसार उपलब्ध करुन देण्यात येतील.

क) समितीस आवश्यतेनुसार करावयाच्या भेटींचे आयोजन यशदाकडून त्यांच्या प्रचलित पध्दतीनुसार करण्यात येईल.

ड) सल्लागार समितीचे अध्यक्ष यांना प्रवास व दैनिक भत्ता हा भारत सरकारच्या सचिवांच्या अनुज्ञेयतेनुसार यशदाकडून अदा करण्यात येईल.

* सल्लागार समितीच्या तज्ञ सदस्यांचे नामनिर्देशन, मानधन व अनुषंगिक बाबी वेगळ्याने निश्चित करण्यात येतील. समितीचे कामकाज लगेच सुरु करण्यात येईल. समितीच्या कामकाजाचीच कार्यपध्दती व अनुषंगिक बाबी समितीकडून ठरविण्यात येतील. यशदातील धोरण संशोधन केंद्रासाठी मंजूर केलेले वार्षिक अनुदान रु.५ कोटी यामधून समितीच्या कामकाजावरील खर्च भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७१११६१२०१५३८८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b0580130544ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a8, cn=Mukesh Khullar
Date: 2017.11.16 12:05:03 +05'30'

(मुकेश खुल्लर)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) सर्व मा.मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -३२.
५) सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मंत्रालयीन विभाग.
६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७) सर्व विभागीय आयुक्त.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) महासंचालक, यशदा, बाणेर रोड, पुणे-४११ ००७.
१०) सर्व मंत्रालयीन विभाग.
११) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

१२) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर *
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर *
१५) प्रबंधक, लोक आयुक्त आणि उपलोकआयुक्त कार्यालय, मुंबई *
१६) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
१७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
१८) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई.
१९) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
२०) अपर मुख्य सचिव (सेवा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
२१) निवडनस्ती/कार्या-१२अ, साप्रवि, मंत्रालय, मुंबई-३२.

* पत्राने